# ३६ . राजा व त्याच्या ४ राण्या

एक आटपाट नगरचा राजा होता . त्याला ४ राण्या होत्या . त्याचे ३ राण्यांवर जीवापाड प्रेम होते पण पहिली राणी त्याला फारशी आवडत नसे .

एक दिवस राजा आजारी पडतो . राजवैद्य , हकीम दवापाणी करतात पण गुण येत नाही . राजाच्या मनाची खात्री पटते कि आता तो मरणार . त्याच्या मनात विचार येतो कि आपण मेल्यानंतर आपल्याबरोबर कोण येईल ते बघावे .

प्रथम तो दुस-या राणीकडे जातो व विचारतो कि तु माझ्याबरोबर येणार का ?

राणी म्हणते का म्हणून मी येऊ ? मी दुसरे लग्न करीन .

मग राजा तिस-या राणीकडे जातो . ही राणीपण तोंड फिरवते . ती म्हणते की मी दुस-याकडे जाईन .

मग राजा चौथ्या राणीकडे जातो . ती राणीपण नकार देते . ती म्हणते की तुला फारतर स्मशानापर्यंत सोबत करीन .

हे सर्व ऐकून राजाला फार वाईट वाटते . ज्यांच्यावर प्रेम केले , ज्यांचे आपण लाड केले त्यांना आपली किंमतच नाही .

दुःखी मनाने मग राजा पहिल्या राणीकडे जातो . ही राणी मात्र राजाबरोबर जायला तयार होते . राणी म्हणते कि जिथे तुम्ही तिथेच मी पण असणार . राजाला आपली चूक उमगते पण खूप उशीर झालेला असतो .

मित्रांनो तुम्हाला अंदाज आला असेलच की ही पण एक बोधकथा आहे . आपल्या सर्वांनाच चार बायका असतात किंवा प्रत्येक विवाहित स्त्रीला ४ नवरे असतात .

राजाची दुसरी राणी म्हणजे आपले शरीर असते . आपण आपल्या शरीरावर खूप प्रेम करतो व मी म्हणजे माझे शरीर अशी गल्लत करून बसतो . आपल्या शरीराचे आपण नको इतके लाड करतो . आपण ओळखले पाहिजे की शरीर एक मशीन आहे व जशी आपण मशीनची काळजी घेतो तशीच व तेवढीच काळजी शरीराची घेतली पाहिजे . एक दिवस हे शरीर गळून पडणार आहे . कारण शरीर हे नश्वर आहे .

तिसरी राणी म्हणजे आपण मिळविलेली संपत्ती पैसाअडका . आपण मेल्यानंतर ही संपत्ती आपल्या बरोबर येऊ शकत नाही . तर ती आपल्या वारसाना विनासायास मिळते . म्हणून अगदी पूरेशी संपत्ती मिळवावी व जास्तीच्या संपत्तीच्या विनीयोग आपल्या हयातीतच समाजासाठी केला तर आपण शरीराने नाही तरी किर्ती रूपाने आपण ह्या पृथ्वीतलावर जिंवत राहू . खरे म्हणजे समाज सेवा ही सात्विक असावी पण राजस समाजसेवेचेहि सुद्धा आज गरज आहेच .

चौथी राणी म्हणजे आपली मित्रमंडळी , नातेवाईक . हे सर्वजण आपल्याला स्मशानापर्यंतच सोबत करतात .

पहिली राणी म्हणजे आपला आत्मा . आपण आत्म्याकडे बरेच वेळा दुर्लक्ष करतो . गीतेची शिकवण वाचनापुरतीच उरते . आत्मा अमर असतो . शरीर नश्वर असते वगैरे . आपल्याबरोबर आपला आत्माच येतो . कारण आपण म्हणजे आपला आत्माच असतो . पण ही गोष्ट खूप उशीरा लक्षात येते .

काय मित्रांनो कशी वाटली गोष्ट ? आता कोणत्या राणीवर जास्त प्रेम करणार ?